ePaper
| वर्ष - 7 । अंक -60 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | ।गुरुवार, दिनांक 28 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# "...त्यांच्यापेक्षा मोठे गद्दार महाराष्ट्रात कुणीही नाही", देवेंद्र फडणवीस



आतील पानांत
- राष्ट्रवादीने 70 कोटींचा घोटाळा केला
- सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी महापालिका प्रशासनाचा 'मास्टर प्लॅन'!

# उद्योजकांच्या पुनर्वसनासाठी 'हातभार'!

## » महापालिका इमारत उभारणार : स्थायी समितीमध्ये आयुक्तांची मंजुरी

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी एमआयडीसी मधील आरक्षण क्र. ४० प्लॉट नं. २०१ येथे उद्योजकांच्या पुनर्वसनासाठी इमारत बांधणे, या कामांतर्गत अग्निप्रतिबंधक यंत्रणा व विद्युत विषयक कामे करणेकामी येणाऱ्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली. महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज मंजुरी दिली. अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.**



यावेळी नाशिक फाटा येथील भारतरत्न जे. आर. डी. टाटा व मधुकर पवळे तसेच भक्ती शक्ती उड्डाणपुलावरील रंगीत दिव्यांची देखभाल व दुरूस्ती करणे, रावेत येथील रेल्वे उड्डाणपुलालगत असलेला सेवा रस्ता विकसीत करणे. अनुषंगिक कामे करण्यास सुधारीत मान्यता देण्यास, केंद्र शासन पुरस्कृत अमृता २.० अभियान अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील चिखली तलावाचे पुनरूज्जीवन व सुशोभिकरण करण्यास, महानगरपालिकेच्या जलतरण तलावाकरिता ठेकेदारी पद्धतीने





सुरक्षा अधिकारी तथा व्यवस्थापक घेण्यास मान्यता देण्यास, प्रभाग क्र. १८ मधील १८.०० मी. डी. पी. रस्त्यास पवना नदी वरील बटरफ्लाय पुलाची उर्वरीत स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करण्यास, मौजे वाकी तर्फे वाडा, ता. खेड, जि. पुणे येथील भामा आसखेड धरणाजवळ गट नं. २८ पैकी मधील अँप्रोज ब्रीज व इतर अनुषंगिक कामाकरितापालिका हद्दीबाहेरील विकास योजने व्यतिरिक्त जमीनीचे भूसंपादन करण्यास, इ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत मोशी, चऱ्होली, वडमुखवाडी, डुडूळगावमधील ड्रेनेज लाईन व चेंबर्सची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने देखभाल व दुरूस्ती करणे व डांबरी रस्त्याखाली गेलेले चेंबर्स रस्त्याच्या समपातळीस घेण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

### तृतीयपंथी सुमदायासाठी कौशल्य प्रशिक्षण...

»तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) समुदायासाठी कौशल्य प्रशिक्षण देण्यास, पदव्युत्तर संस्था वायसीएम रुग्णालयाकरिता एकत्रित तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ निवासी व वैद्यकीय अधिकारी या पदावर दिलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत, प्रभाग क्र. ६ मध्ये धावडे वस्ती, भगत वस्ती, गुळवे वस्ती, चक्रपाणी वसाहत, लांडगे वस्ती, सद्गुरूनगर व परिसरात खड्डे, चर व रस्त्यांची दुरूस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

### अवैध फ्लेक्स हटवण्यासाठी एजन्सी...

**»पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील मौजे तळवडे येथील इंद्रायणी नदीलगताच १२ मी व ३० मी रुंदीच्या रस्त्याने बाधीत जमिनीचे भूसंपादन करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. अनधिकृत (होर्डिंग्ज) जाहिरात फलक निष्कासित करणेसाठी अतिरिक्त जादा एजन्सीची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली. इ प्रभागातील व्यायाम शाळा, बॅडमिंटन हॉल इ. क्रिडा विषयक सुविधांची स्थापत्य विषयक कामे करणेबाबत, आपत्ती व्यवस्थापन करिता पावसाळ्यामध्ये साचलेले पाणी उपसा करण्यासाठी ट्रॉलीवर बसवलेले पंप खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

# आमदार लांडगेंना मंत्रीपद मिळाल्यास आनंदच!

## » शंकर जगताप यांची भावना : 'पिंपरी-चिंचवडकर' म्हणून संधी मिळण्याची अपेक्षा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराचे लोकनेते प्रा. रामकृष्ण मोरे यांच्यानंतर पिंपरी-चिंचवडला आतापर्यंत मंत्रीपद मिळाले नाही. आता भाजपा शहराध्यक्ष आणि भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांना मंत्रीपद मिळाले, तर आनंदच आहेच, शहरवासीयांचीही इच्छा आहे, असे मत भाजपाचे प्रदेश निमंत्रीत सदस्य तथा माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**

भारतीय जनता पार्टीतर्फे चिंचवड विधानसभा मतदार संघांतर्गत "मोदी@9महा-जनसंपर्क अभियान" राबविण्यात येत आहे. या निमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत अभियानाची माहिती देण्यात आली. यावेळी चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीमती अश्विनीताई लक्ष्मणभाऊ जगताप, माजी सत्तारुढ पक्षनेते श्री. नामदेव ढाके, चिंचवड विधानसभा



निवडणूक प्रमुख श्री. काळुराम बारणे, माजी नगरसेवक श्री. शत्रुघ्न काटे, महिला मोर्चा शहराध्यक्षा उज्वला गावडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शंकर जगताप म्हणाले की, पिंपरी-चिंचवडकर म्हणून प्रा. रामकृष्ण मोरे यांच्यानंतर शहराला मंत्रीपद मिळालेले नाही. आता आमदार लांडगे यांना मंत्रीपदी संधी मिळेल, अशी चर्चा आहे. त्यामुळे भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी सर्वांनाच आनंद होईल. 'बदल' हा असायलाच हवा... पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्षपदी आमदार महेश लांडगे यांचा कार्यकाळ संपलेला आहे. त्यांच्यावर शिरुर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी पक्षाने दिली आहे. या पार्श्वभूमीवर शहराध्यक्षपदी चिंचवडला संधी मिळावी, याबाबत विचारले असता आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या की, पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य आहे.

# राष्ट्रवादीने 70 कोटींचा घोटाळा केला

## » शिखर बँकेच्या घोटाळ्यावरून मोदींची टीका, शरद पवार, सुप्रिया सुळे निशाण्यावर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात सध्या नेतेमंडळी एकमेकांवर टीका करण्यातच व्यस्त आहेत. आज पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाच वंदे भारत रेल्वेंना हिरवा झेंडा दाखवला. यावेळी यावेळी त्यांनी विरोधी पक्षावर टीका करत त्यांचा चांगलाच समाचार घेतला. टीका करताना मोदींनी शरद पवार आणि सुप्रिया सुळेंनाही सोडले नाही. त्यांच्यावरही टीका करत वक्तव्य केले आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर ७०,००० कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप असल्याचे मोदी म्हणाले.**

ते पुढे म्हणाले की, असं एकही क्षेत्र नाही जिथे काँग्रेसने घोटाळा केला नाही. तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादीवरही घोटाळ्यांचा आरोप आहे. यानंतर त्यांनी सुप्रिया सुळेंवरही टीका केली. तुम्हाला शरद पवारांच्या मुलीचं भलं करायचं असेल तर तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मतदान करा. मात्र तुम्हाला जर तुमच्या मुला-मुलींचं आणि नातवंडांचं भलं करायचं असेल तर तुम्ही भाजपाला मतदान करा, असे मोदी यावेळी म्हणाले.

पंतप्रधान मोदींच्या या टीकेला शरद पवारांनी प्रत्युत्तर दिले आहे. पवार म्हणाले की, पंतप्रधानांनी देशवासियांबद्दल काय बोललं पाहिजे याचा नमुना देशासमोर ठेवला आहे. पंतप्रधानांनी केलेल्या वक्तव्याबद्दल त्यांनी स्वतः विचार करण्याची गरज आहे. शिखर बँकेचा त्यांनी उल्लेख केला. मी कधी शिखर बँकेचा मेंबर नव्हतो. मी शिखर बँकेतून कधीही कर्ज घेतले नाही. मी त्या संस्थेचा कधीच सदस्य नव्हतो. याबाबत बोलणे कितपत ठीक आहे? त्यांनी जो उल्लेख केला त्यात शिखर बँक हे प्रकरण न्यायालयात गेले आहे. त्यात माझा शिखर बँकेसोबत काही संबंध नाही हे स्पष्ट झालेले आहे. सुप्रिया सुळे यांचे नाव घेण्याचे काहीही कारण नाही. अशा इन्स्टिट्यूट सोबत त्या राहत नाहीत हे बहुतांश लोकांना माहीत आहे. परंतु मोठ्या प्रमाणावर देशातील विरोधी पक्षाचे लोक एकत्र येतात. देशाच्या सम

यावेळी शरद पवारांनी बीआरएसमध्ये प्रवेश करणाऱ्या भगीरथ भालकेंवरही त्यांची प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, एखादी व्यक्ती गेली तर फार चिंता करायची गरज नसते. भालके यांना आम्ही ज्या वेळेला विधानसभेला संधी दिली त्याच्यानंतर आमच्या लक्षात आलं होतं की आमची ही निवड चुकीची होती. त्याच्यावर मी भाष्य करू इच्छित नाही.



### चिंताग्रस्त आणि वादग्रस्त...

**»केसीआर यांच्यावर बोलताना पवार म्हणाले, शेजारच्या राज्याचे मुख्यमंत्री इथे आले दर्शनासाठी त्यावर हरकत घ्यायचं काही कारण नाही. परंतु जे काही विठ्ठलाची पूजा हा वेगळा भाग पण त्याशिवाय जे काही जबरदस्त ताकद दाखवण्याचा प्रयत्न शेकडो गाड्या आणि बाकीच्या इतर गोष्टी हे चिंताग्रस्त आणि वादग्रस्त आहे.**

# पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात सर्वसामान्य नागरिकांचा विकास

## » आ. अश्विनी जगताप : चिंचवडमध्ये 'मोदी@9' महा-जनसंपर्क अभियान

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली मागील नऊ वर्षात सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून विकास प्रकल्प राबविण्यात आले. या विकास प्रकल्पांचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष लाभ देशभरातील सर्वस्तरातील महिला, कष्टकरी कामगार यांना झाला आहे. या विविध विकास प्रकल्पांची माहिती सर्व नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वाखाली आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली देशात आणि राज्यात "मोदी@9 महा-जनसंपर्क अभियान" राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत चिंचवड विधानसभा तसेच मावळ लोकसभा मतदार संघात हे अभियान राबविण्यात आले. यानिमित्ताने पत्रकार परिषदेत माहिती देताना आमदार जगताप बोलत होत्या.**



यावेळी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, भाजपा प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य शंकर जगताप, "मोदी@9" चे चिंचवड विधानसभा संयोजक व जिल्हा सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे, माजी पक्षनेते नामदेव ढाके, "मोदी@9" प्रदेश सदस्य संतोष कलाटे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष संकेत चोंधे, महिला मोर्चा शहर अध्यक्षा उज्वला गावडे, "मोदी@9" अंतर्गत अभियानांचे संयोजक शत्रुघ्न काटे, माजी नगरसेवक संदीप कस्पटे, राजेंद्र चिंचवडे, शारदा सोनवणे, बाळासाहेब ओव्हाळ, सागर आंघोळकर, माजी प्रभाग स्विकृत सदस्य संदीप गाडे, भाजपा सांगवी काळेवाडी मंडल अध्यक्ष विनोद तापकीर, चिंचवड किवळे मंडल अध्यक्ष योगेश चिंचवडे आदी प्रमुख उपस्थित होते.

आश्विनी जगताप म्हणाल्या की, भारतीय जनता पार्टीचे नेते आणि या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या कार्यकलाला नऊ वर्ष पूर्ण झालेले आहेत. या नऊ वर्षांमध्ये मोदी सरकारने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. सर्व सामान्य नागरिकांना लाभदायक ठरतील आशा अनेक चांगल्या योजना त्यांनी देशवासीयांकरिता आणल्या आणि त्या प्रभावीपणे राबविल्या आहेत ही सर्व विकास कामे जनतेपर्यंत पोहोचवावीत याकरता भारतीय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वात देशातील सर्व लोकसभा व विधानसभा क्षेत्रांमध्ये महा जनसंपर्क अभियान व विविध कार्यक्रम म्हणजेच "मोदी@9" राबविण्यात येत आहेत.

### चिंताग्रस्त आणि वादग्रस्त...

**»महापालिकेत पुन्हा भाजपाची सत्ता येणार : जगताप भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घरोघरी संपर्क साधला असून, चिंचवड विधानसभा मतदारसंघातील एक लाख कुटुंबांपर्यंत पोहचण्याचा भाजपाचा संकल्प आहे. आगामी काळात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. आता पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवड मनपावर भाजपची सत्ता येणार असल्याचा विश्वास आमदार अश्विनी जगताप यांनी व्यक्त केला.**

# पुण्यात टोळीयुद्धाचा थरार; शहरात खळबळ

## » मध्यरात्री गाड्यांची तोडफोड

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



पुणे शहरात काल रात्री दोन टोळ्यांच्या पूर्ववैमनस्यातून झालेल्या वादात सहकारनगर येथील अण्णाभाऊ साठे वस्तीत गाड्यांची तोडफोड करण्यात आली. यावेळी रहिवाशांच्या घराच्या दरवाजावरही कोयत्याने वार करत दरवाजा तोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. दोन टोळक्यांच्या पूर्ववैमनस्याच्या वादातून रात्री दोन वाजताच्या सुमारास शहरातील अरण्येश्वर येथे १० ते १२ गाड्या फोडल्याची घटना घडली आहे. या वेळी टोळक्यांनी एका घराचा दरवाजा कोयत्याचे वार करत तोडण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून परिसरातील रहिवाशांमध्ये दहशत पसरली आहे. दोन टोळीच्या वादातून हा प्रकार घडल्याची माहिती मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील सहकारनगर हद्दीत आणाभाऊ साठे वस्तती काल रात्री दोन वाजताच्या सुमारास काही अज्ञात टोळक्यांनी १० ते १२ दुचाकी फोडल्या होत्या, हा सगळा प्रकार जुन्या वादातून घडला असावा असे स्थानिकांचे म्हणणे आहे. मात्र, सहकारनगर हद्दीत या पूर्वीही टोळी युद्धाच्या वादातून नागरिकांच्या गाड्या फोडल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यानंतर सहकारनगर पोलीस स्टेशनवर गुन्हे शाखेच्या अखत्यारीत ठेवण्यात आले होते. परंतु, तरीही याचा काही उपयोग होताना दिसत नाही. गुन्हेगार प्रवृत्तीच्या टोळ्या सरेआम पुणे शहरात दहशत माजवण्याचं काम करतच आहे. अण्णाभाऊ साठे वस्तीत गाड्यांची तोडफोड झाल्यानंतर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त सुनील झेंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. या प्रकरणाची एका स्थानिकाने पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आज सकाळीपासून अज्ञात आरोपींविरोधात गुन्हे दाखल करण्याच काम सुरू आहे.

# प्रशासकीय शिस्तीमध्ये ‘नो कॉम्प्रमाईज्’!

## आयुक्त शेखर सिंह अन् उपायुक्त स्मिता झगडे प्रशासकीय वाद अन् वस्तुस्थिती!










।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील राज्य शासन नियुक्त अधिकारी आणि महापालिका अस्थापनेवरील अधिकारी यांच्यातील वाद नवा नाही. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात कर संकलन विभागाच्या प्रमुख असलेल्या विद्यमान उपायुक्त स्मिता झगडे यांच्यात नवा प्रशासकीय वाद चव्हाट्यावर आला आहे. यानिमित्ताने महिला अधिकारी असल्याने झगडे यांना ‘डॉमिनंट’ केले जाते का? असा प्रश्न उपस्थित केला जातो. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची वस्तुस्थिती ‘महाईन्यूज’ च्या माध्यमातून तपासण्यात आली.**

जगभरात प्रसिद्ध टाटा मोटर्स कंपनी, पद्मश्री गिरीष प्रभूणे यांची समरसता पुनरूत्थान गुरूकुलम संस्थेला कर संकलन विभागाच्या प्रमुख असताना स्मिता झगडे यांनी नोटीस बजावली होती. त्यामुळे तत्कालीन सत्ताधारी भाजपा नगरसेवक विरुद्ध झगडे असा वाद निर्माण झाला होता.

मध्यंतरी, पदावनतीमुळे झगडे यांनी ‘मॅट’मध्ये (महाराष्ट्र ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रिब्युनल) धाव घेतली. पहिल्यांदा ‘मॅट’ ने त्यांच्या बाजुने निर्णय दिला. त्यानंतर त्याला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सध्या हे प्रकरण पुन्हा ‘मॅट’मध्ये आहे. क्षमता असतानाही प्रशासकीय यंत्रणेतील राजकारणामुळे झगडे यांना पदोन्नतीपासून वंचित ठेवले जात आहे, असा आक्षेप घेतला जात होता.

दरम्यान, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी राज्याच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिवांना दि.२३ जून २०२३ रोजी पत्र पाठवले आहे. ‘उप आयुक्त’ अभिमानाचे पदावरील प्रतिनियुक्तीवरील सेवा शासन सेवेत प्रत्यार्पित करण्याची विनंती केली आहे. तत्पूर्वी, गेल्या चार-पाच दिवसांत झगडे यांच्या ‘रजा’ मंजुरीवरुन प्रशासन विरुद्ध झगडे असा वाद निर्माण झाला असून, त्याला हेतुपुरस्सर आयुक्त शेखर सिंह विरुद्ध झगडे असा रंग देण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे आयुक्तांना बदनाम केले जात आहे का? असा प्रश्न आहे.

### बदलीनंतर झगडेंची स्थायी समिती सभेला अनुपस्थिती...

दि. १३ एप्रिल २०२४ रोजी महापालिका अंतर्गत बदल्या झाल्या. त्यामध्ये झगडे यांना उप आयुक्त म्हणून नागरी सुविधा केंद्र विभागाचे कामकाज सोपवले होते. त्याला अनुसरून, झगडे यांनी दि. २४ एप्रिल २०२३ रोजी प्रशासनाला बदलीच्या ठिकाणी पदभार स्विकारला आहे. मात्र, प्रशासक यांच्या उपस्थितीमध्ये होणारी महापालिका सभा, स्थायी समिती सभांना झगडे अनुपस्थित राहिल्या आहेत.

### रजा नामंजूर तरीही परदेश दौरा...

» स्मिता झगडे यांनी दि. २ मे २०२३ रोजी दि. ११ मे २०२३ ते दि. २० मे २०२३ अशी दहा दिवस अर्जित रजा मिळण्याबाबत अर्ज केला होता. त्यावेळी प्रशासन विभागामार्फत पर्यायी नेमणूक करावी, असे त्यांना कळवले होते. पर्यायी नेमणूक झाली, तर रजा घ्यावी, असे कळवले असतानाही, “केवळ ‘व्हीजा’ मिळणेकामी अर्ज करायचा आहे. रजा मंजूर झाली तरच मी परदेशात जाणार आहे.” असे झगडे यांनी सांगितले होते. अर्जित रजा मंजुरीबाबत अंतिम आदेश प्राप्त नसताना झगडे यांनी परस्पर परदेशवारी केली. त्यानंतर पुन्हा दि. ५ जुलै २०२३ रोजी वैद्यकीय रजेसाठी अर्ज दाखल केला आहे.

### कायदा काय सांगतो?

» महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही- २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२ दिनांक १७/१२/२०१६ नुसार प्रतिनियुक्तीवरसेवा घेणाऱ्या कार्यालयास काही विशिष्ट कारणास्तव विहित कालावधी संपण्यापूर्वी प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यास त्याच्या मूळ प्रशासकीय विभागास/ कार्यालयाकडे परत पाठवणे आवश्यक असल्यास, त्या अस्थापनेवरील ...

### आयुक्त शेखर सिंह यांची भूमिका काय?

» पिंपरी-चिंचवड महापालिका अस्थापनेवर दि. ६ जानेवारी २०१८ रोजी सहाय्यक आयुक्त या अभिमानाच्या पदावर शासन प्रतिनियुक्तीने स्मिता झगडे रुजू झाल्या आहेत. त्यानंतर नगर विकास विभागाच्या आदेशानुसार, उपायुक्त संवर्गात पदोन्नती देण्यात आली. त्यामुळे झगडे यांचा महापालिका सेवेत एकूण कार्यकाळ ५ वर्षे ५ महिने झालेला आहे. अर्जित रजा मंजुरीबाबत अंतिम आदेश प्राप्त नसताना परस्पर पदेशात गेल्याचे आणि कार्यालयात उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले आहे. नागरी सुविधा केंद्र विभागात पदस्थापना दिल्यापासून महापालिका सभा, स्थायी समिती सभा बैठकीला अनुपस्थित आहेत. या बाबींचा विचार करता झगडे यांचा महापालिका सेवेतील प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आणून त्यांची सेवा शासन सेवेत प्रत्यार्पित करण्यात यावी, अशी विनंती आयुक्त शेखर सिंह यांनी राज्याच्या नगर विकास विभागाकडे केली आहे.

### स्मिता झगडे यांची भूमिका काय?

» अतिरिक्त आयुक्तांनी माझी रजा मंजूर केली होती. परदेशात गेल्यानंतर आयुक्तांनी रजा नामंजूर केल्याचे पत्र प्रशासनाने मला पाठवले. आयुक्तांनी आकसातून शासन सेवेत घेण्याबाबतचे पत्र पाठवल्याचे स्पष्टीकरण पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उपायुक्त स्मिता झगडे यांनी दिले. माझ्याकडे असलेल्या नागरी सुविधा केंद्र या विभागाचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप आहेत. नियमानुसार मी त्यांच्याकडून रजा मंजूर करून घेतली होती. अतिरिक्त आयुक्तांना रजा मंजुरीचे अधिकार आहेत. रजा मंजुरीनंतर मी नातेवाईकांच्या लग्नासाठी परदेशात गेले होते. मात्र, परदेशात गेल्यानंतर आयुक्तांनी रजा नामंजूर केल्याचा ई-मेल मला प्रशासनाने पाठविला. तो मेल मी उशिराने बघितला, असे झगडे यांनी म्हटले आहे.

### आयुक्तांनी कोणता अधिकार वापरला?

» महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही- २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२ दिनांक १७/१२/२०१६ नुसार प्रतिनियुक्तीवर सेवा घेणाऱ्या कार्यालयास काही विशिष्ट कारणास्तव विहित कालावधी संपण्यापूर्वी प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यास त्याच्या मूळ प्रशासकीय विभागास/ कार्यालयाकडे परत पाठवणे आवश्यक असल्यास, त्या अस्थापनेवरील सक्षम प्राधिकाऱ्याने तसेच समर्थनीय कारण स्पष्ट करुन त्याला/तिला परत पाठवण्यासाठी यथास्थिती संबंधित प्रशासकीय विभागास/ कार्यालयास तीन महिन्याची पूर्वसूचना (नोटीस) पाठवणे आवश्यक आहे.

### निष्कर्ष :

» उपायुक्त स्मिता झगडे यांनी बदली केलेल्या अस्थापनेवर रुजू झाल्या. पण, त्यानंतर महापालिका सभा, स्थायी समिती सभा बैठकीला उपस्थित दर्शवली नाही. अर्जित रजा नामंजूर झालेली असताना परदेशात दौरा केला.

» प्रशासकीय कामकाजात “हम करें सो कायदा...” चालत नाही. ‘व्हीजा’ साठी घेतलेली मंजुरी अंतिम आदेश होवू शकतात का? हे पाहणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आयुक्त शेखर सिंह यांनी घेतलेली कठोर भूमिका केवळ मनमानीला लगाम घालण्यासाठी असावी, असे स्पष्ट होते.

# आपल्या जागेवर आपण सगळेच कर्तव्याने वागलो तर हे जगणे सोपे होते!




**निसर्ग आणि त्याने घालून दिलेली "लाईफ सायकल " जर आपण सगळ्यांनी काटेकोरपणे पाळली तर कुठेही समस्या निर्माण होणार नाहीत मात्र आपण नियम किंवा कर्तव्याने वागत नाही म्हणून बहुतांश समस्या निर्माण होतात असे गेल्या अनेक वर्षांपासून अभ्यासकांच्या लक्षात आले आहे. अनेकदा आपण काहीही केले नाही तरी चालते मात्र आपण काहीतरी कृती करतो नेमकी तीच निसर्गाच्या मुळावर येत असते त्यातून निसर्गाला मदत तर दूरच उलट आपण निसर्गाचे कर्दनकाळ म्हणून पुढे येत असतो.**

समाजात काही व्यक्ती अश्या असतात की ते स्वतः काहीच करीत नाहीत अन इतरांना सुद्धा काही करू देत नाहीत ,अश्यावेळी कुणीतरी वडीलधारी व्यक्ती तिला सांगते की बाबा रे तू काहीही केले नाही तरी चालेल पण कुठेही लक्ष तरी घालू नको , नको ते उपद्व्याप करून आम्हाला अडचणीत अनु नको. अनेकांचे असेच असते. काहीतरी करण्याच्या नावाखाली हे लोक नसत्या उचापती करून ठेवतात.

आपल्या सभोवताल खूप गोष्टी अगदी सोप्या असतात आपण त्यांना उगाच कठीण आणि अवघड करून ठेवत असतो. दरवर्षी तपणारा उन्हाळा आणि त्रासदायक होणारी ग्लोबल वार्मिंगची समस्या मानवाला भेडसावत आहे त्यासाठी झाडे लावा अश्या मोहीम सरकार,आणि स्वयंसेवी संस्था हातात घेत असतात ,त्यावर कोट्यवधी रुपये खर्च होतात. सहभागी माणूस चुकून एखादे झाड लावतो आणि नित्याच्या वागण्यात असंख्य झाडांची कत्तल करीत असतो असे अनेकदा जाणवते. निसर्गाने स्वतःच्या निर्माण आणि संगोपनाची सुंदर व्यवस्था निर्माण केलेली असते आपण त्यात हस्तक्षेप करतो



आणि रंगाचा बेरंग होतो. आपल्या सभोवताल तुम्ही एकही झाड लावले नाही तरी चालेल कारण ती आपोआप उगवत असतात तुम्ही फक्त एवढे करा की तुमच्या हातून एकही झाड उपटले किंवा तोडले जाऊ नये. कोणत्याही अपरिहार्य कारणाने झाड तोडावेच लागत असेल तर त्या बदल्यात किमान १० झाडे लावा आणि जगवून दाखवा.

आपण अनेकदा निसर्गप्रेमी म्हणून मिरवत असतो . अनेकदा नद्यांच्या स्वच्छतेची मोहीम हाती घेतो , त्याचा भलामोठा इव्हेन्ट साजरा केला जातो आणि उद्देश सफल झाला की त्या नदीचे पुन्हा डबके तयार होते आपण हळूच दुसऱ्या कामात व्यस्त झालेले असतो. मुळात असे करण्याची गरज नाही. तुम्ही कुठल्याही नदीला स्वच्छ करण्याची गरज नाही ,ती मुळातच प्रवाही असते फक्त नागरिक म्हणून तुम्ही तुमच्या कर्तव्याला जागा आणि तिच्या प्रवाहात घाण करू नका. कचरा,घाण पाणी,निर्माल्य,एवढेच काय मेलेली जनावरे सुद्धा नदीत फेकताना कुणालाही अपराधीपणाची जाणीव होऊ नये असे आपण सगळे वागत असतो. नदीला स्वच्छ करू नका फक्त तिला घाण करणार नाही याची काळजी घ्या नदी आपोआप स्वच्छ होऊन पुन्हा प्रवाही होऊन वाहायला लागेल. निसर्गाने हा इशारा मानवाला नेहमी दिला असतो की तुम्ही काहीही करू नका फक्त स्वतःची पाली सोडू नका.

काही लोक उगाच जगाचे शांतिदूत म्हणून फिरत असतात. प्रत्येक शहरात सुद्धा असे कथित शांतिदूत असतात , काहींनी तर त्याच विषयाला आयुष्य वाहून घेतलेले असते. समाजात शांतता आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे असते मात्र त्यांना हे समजावून सांगण्याची गरज आहे की समाज हा नेहमी शांतच असतो तुम्ही फक्त द्वेष पसरणार नाही याची काळजी घ्या. मात्र तसे होताना दिसत नाही. अहोरात्र द्वेष प्रसार करणारे घटक आजकाल पोलिसांच्या शांतता समितीचे बिल्लाधारी सदस्य बनलेले असतात आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीला सर्वात पुढची खुर्ची घेऊन बसलेले दिसतात. समाजाचे मूळ शांतता आहेच फक्त तुम्ही कुणाचेही मन दुखावणार नाही अशी भाषा वापरू नका , जे स्वतःला आवडणार नाही असे वर्तन इतरांच्या बाबतीत करू नका.

सरकार शेतकऱ्यांचा कैवारी असल्याचा नेहमी आभास निर्माण करीत असते मात्र जो जगाला पोसतो त्याचा कुणाला कैवारी होण्याची गरज नाही तो समर्थ आहे फक्त सरकारने त्याच्या जीवनातअनावश्यक हस्तक्षेप करणे सोडावे मग बघा तो स्वतःसह जगाला कसा संरक्षित ठेवतो. शेतमालाला सुद्धा योग्य भाव मिळतो फक्त सरकारी हस्तक्षेप थांबायला हवा. त्यासोबतच कुणी प्राण्यांचे संरक्षक होण्याचीही गरज नाही तुम्ही एवढेच करा की प्राणी मारू नका ,हिरवीगार जंगले मूठभर स्वार्थापायी जाळू नका. कुणी समाजाला जगणे शिकवायला निघाला आहे तर कुणी भक्ती सांगायला निघाला आहे ,मुळात जगात लाखो वर्ष जे आहे ते अगदी जागेवर आहे , त्याला आणखी काही शिकविण्याची गरज नाही फक्त शिकविण्याची धडपड करणार्यांनी स्वतःला व्यवस्थित करायला हवे कारण अनेक व्यक्तींचा समाज बनतो. एक व्यक्ती सुधारली तर कदाचित देश आणि समाज सुधारेल.

## संपादकीय »

### स्वयंरोजगारातून समृद्धी

***पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या यंदाच्या अमेरिका भेटीचे एक सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पंतप्रधान मोदींची ही पहिली 'स्टेट व्हिजिट' होती. .***

सामान्य भारतीयांचा यशस्वी होण्याचा मार्ग ठरलेला आहे. सातवी-आठवीपासूनजोरदार अभ्यास. मग तबला, पोहणे, नाच, कराटे वगैरे सगळे दूर. त्यांची जागा शिकवण्या घेतात. बारावीपर्यंत झापडबंद अभ्यास. ध्येय ठरलेले - उत्तम इंजिनीअरिंग किंवा मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश. विज्ञानात रस नसणाऱ्यांना चार्टर्ड अकाउंटंट व्हायचे असते. सधन लोकांना अमेरिकेत शिकणे, हेच सार्थक वाटते. दर वर्षी चाळीस हजार कोटी रुपयांचे शिक्षण आपण एका अमेरिकेतून आयात करतो. म्हणजे आपले युवक एकत्रित इतका खर्च करून तेथे शिकायला जातात. हे सगळे मोठ्या पॅकेजची नोकरी मिळविण्यासाठी.

आयुष्यात यश मिळविण्याचा हाच एक मार्ग आहे, अशी भारतीयांची श्रद्धा आहे. त्यामुळे भजी तळणे आणि ती विकणे, हेदेखील एक महत्त्वाचे करिअर आहे, असे पंतप्रधानांनी म्हणताच त्यांच्यावर टीका झाली.

**संज्ञानात्मक चेताशास्त्रज्ञ ह्यूगो स्पायर्स यांच्या मते, मेंदूमधील एका विशिष्ट यंत्रणेमुळे हे लोक नेहमी उशिरा येतात, कारण तिथे जाण्यासाठी कमी वेळ लागेल, असा त्यांचा अंदाज असतो. मेंदूचा हिपोकॅम्पस हा भाग वेळेच्या काही पैलूंवर प्रक्रिया करतो.**

## कोरड्या जमिनी जपण्यासाठी...

कोरड्या जमिनीचा ऱ्हास होऊन जमिनीचे वाळवंट झाल्यास शेतीचे उत्पादन कमी होते, दुष्काळांत भर पडते आणि हवामान बदलाचा मनुष्याला असलेला धोकाही वाढतो.त्यामुळे विविध उपाय योजना करून कोरड्या जमिनी जपल्या पाहिजेत. कोरड्या जमिनी जपण्यासाठी .. जगभरात ४० टक्के क्षेत्र व्यापणारा आणि दोन अब्ज लोकांचा अधिवास असलेला कोरडा भूभाग हा हवामानातील बदलांशी आणि पाणीटंचाईशी चांगल्या प्रकारे जुळवून घेत असतो. मात्र, जंगलतोड, अनियंत्रित गुरेचराई आणि अशाश्वत शेतीपद्धती अशा मानवी कृतींमुळे या जमिनींचा ऱ्हास होतो. या जमिनींच्या संवर्धनाचे आव्हान जगापुढे आहे.

'इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर' या संस्थेने याबाबत पावले उचलली आहेत. कोरड्या जमिनी जवळपास सर्व खंडांमध्ये आढळतात. आफ्रिका आणि आशिया खंडात त्या विशेषकरून आहेत. गवताळ कुरणे, सवाना, झुडपांचा भूभाग आणि वनभूमी या सर्वांचा समावेश यात होतो. कोरड्या क्षेत्रात जमिनीचा ऱ्हास होणे म्हणजेच वाळवंटीकरण होय. यामुळे जमिनीची जैविक आणि आर्थिक उत्पादकता कमी होते. वाळवंट झाल्यास शेतीचे उत्पादन कमी होते, दुष्काळांत भर पडते आणि हवामान बदलाचा मनुष्याला असलेला धोकाही वाढतो. कोरड्या जमिनींमधील जैवविविधतेचा ऱ्हास म्हणजे मृदा म्हणजे जमिनीत-मातीत



राहणारे जीवाणू, कवके आणि कीटक यांचा ऱ्हास हे जमिनीच्या ओसाडीकरणाचे एक प्रमुख कारण आणि परिणाम आहे. कोरड्या क्षेत्रातील जैवविविधतेचे संरक्षण केले, तर वर्षभर शेती आणि पशुपालन शक्य आहे. त्यासाठी गवताळ कुरणांचे संरक्षण करणे आणि या जमिनींचा अन्य वापर रोखणे आवश्यक आहे. गवताचे जीवनचक्र आणि मोसम लक्षात घेऊन गुरांच्या कळपांचे स्थलांतर करणे आणि अनियंत्रित गुरेचराई टाळणे हे यावरचे उपाय आहेत. त्याशिवाय, भूव्यवस्थापनासाठी शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब गरजेचा आहे. मृदेतील जैविक घटक व ओलावा यांचे रक्षण करणाऱ्या पारंपरिक शेतीपद्धतींवर भर देण्याची गरज आययूसीएनने अधोरेखित केली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मोदींकडून समान नागरी कायद्याचे संकेत!

## ओवैसींनी छेडला हिंदू अविभाजित कुटुंबाचा मुद्दा

। भोपाळ । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये पसमांदा मुस्लीम समुदायाच्या विकासावर भाष्य केलं. तसेच त्यांनी समान नागरी कायद्याचं महत्त्व पटवून दिलं. यावेळी त्यांनी तिहेरी तलाकवरही भाष्य केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या भाषणावरून AIMIM चे अध्यक्ष असुदूद्दीन ओवैसी यांनी निशाणा साधला आहे.**



"भारताच्या विविधतेला आणि एकतेला पंतप्रधान नरेंद्र मोदी समस्या समजतात. वन नेशन, वन इलेक्शन, वन टॅक्स, वन लॉ, वन कल्चर, वन रिलिजन आणि आता वन फर्टिलायजरबाबतही बोलत आहेत. ही त्यांची खूप मोठी समस्या आहे. त्यामुळे भारताच्या पंतप्रधानांना आर्टिकल २९ समजत नाही. समान नागरी कायद्याबाबत मोदी बोलत आहेत. समान नागरी कायद्यामुळे तुम्ही विविधेतील एकतेला हिसकावणार आहात का? पंतप्रधान नरेंद्र मोदी समान नागरी कायद्याबाबत बोलत नसून ते हिंदू सिव्हिल कोडबाबत बोलत आहेत. मी मोदींना आव्हान देतो की, तुम्ही हिंदू अविभाजित कुटुंबांना बरखास्त करू शकता का?", असा हल्लाबोल औवेसी यांनी केला.

"पंतप्रधान नरेंद्र मोदींना हे समजावून सांगणे आवश्यक आहे की अनुच्छेद २९ हा एक अधिकार आहे. संविधान धर्मनिरपेक्ष आहे. इस्लाममध्ये विवाह एक करार आहे. परंतु, हिंदूंच्या बाबतीत ही गोष्ट जन्मा-जन्माची असते", असंही औवेसी म्हणाले.

"पाकिस्तानचा संदर्भ देऊन मोदी म्हणाले की पाकिस्तानात तीन तलाकवर बंदी आहे. पण मोदींना पाकिस्तानाच्या कायद्यामधून एवढी प्रेरणा का मिळाली? तुम्ही तर येथे तीन तलाक विरोधात कायदाही तयार केला आहे. परंतु, त्याचा काहीही परिणाम झालेला नाही. शिवाय, महिलांवरील अत्याचार अधिक वाढले. कायद्याने समाजात सुधारणा होणार नाहीत. जर कायदा बनवायचाच असेल तर त्या पुरुषांविरोधात बनवा जे लग्नानंतरही आपल्या बायकोला सोडून फरार होतात", असा टोलाही ओवैसींनी लगावला.

### नबी-ए-करीमच्या गौरवाविषयी अपमान

मोदींच्या भाषणानंतर ओवैसी यांनी एक ट्वीटही केलं होतं. त्यात म्हणाले की, "मोदीजी मला सांगा, तुम्ही "हिंदू अविभक्त कुटुंब" (HUF) संपवाल का? कारण यामुळे देशाला दरवर्षी ₹३०६४ कोटींचे नुकसान होत आहे. एकीकडे तुम्ही पसमांदा मुस्लिमांसाठी मगरीचे अश्रू ढाळताय आणि दुसरीकडे तुमचे प्यादे त्यांच्या मशिदींवर हल्ले करत आहेत, त्यांच्या नोकऱ्या हिसकावत आहेत, त्यांच्या घरांवर बुलडोझर चालवत आहेत, त्यांना लिंचिंगद्वारे मारत आहेत आणि त्यांच्या आरक्षणाला विरोधही करत आहेत. तुमच्या सरकारने गरीब मुस्लिमांची शिष्यवृत्तीही रद्द केली आहे, असंही ओवैसी म्हणाले. पसमांदा मुस्लिमांचे शोषण होत असेल तर तुम्ही काय करत आहात? पसमांदा मुस्लिमांची मते मागण्यापूर्वी तुमच्या कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन माफी मागावी, तुमच्या प्रवक्त्याने आणि आमदाराने आमच्या नबी-ए-करीमच्या गौरवाविषयी अपमान केला आहे, असंही ते म्हणाले.

## महाविकास आघाडीचं पुढचं पाऊल,अजित पवारांच्या घरी बैठक , निवडणुकीबाबत चर्चा



। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची आज, बुधवारी मुंबईत बैठक होणार असून, आगामी लोकसभा निवडणुकीत तीनही पक्षांच्या संभाव्य जागावाटपाबाबत या बैठकीत प्राथमिक चर्चा होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या मुंबईतील निवासस्थानी ही बैठक दुपारी तीन वाजता होत असल्याचे सूत्रांकडून समजते. महाराष्ट्रात भाजपने लोकसभा निवडणुकांची तयारी सुरू केली असून, तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्र समितीनेसुद्धा राज्यात निवडणुकांची तयारी चालविली आहे. भाजपच्या केंद्रीय मंत्र्यांचेही राज्याच्या विविध भागात दौरे सुरू आहेत. महाविकास आघाडीतील तीनही पक्षांनी स्वतंत्रपणे पक्षांतर्गत लोकसभा निवडणुकीची चाचपणी सुरू केली आहे. यामुळे उद्या प्रथमच महाविकास आघाडीच्या निवडक नेत्यांची बैठक पवार यांच्या निवासस्थानी होत आहे.

या बैठकीला काँग्रेस पक्षातर्फे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खा. संजय राऊत उपस्थित राहण्याची शक्यता आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला केवळ चंद्रपूरची एकमेव जागा मिळाली होती. यामुळे शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यात जागावाटपाचे काय सूत्र ठरते, याविषयी महाविकास आघाडीत औत्सुक्य आहे.

# 'रेशन'साठी आम आदमीचा आंदोलनाचा इशारा!

## जिल्हा अध्यक्ष राम पाटील यांचे तहसीलदारांना निवेदन

। शिराळा ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अन्न-धान्य पुरवठा विभागाचा भोंगळ कारभार आणि भ्रष्टाचार आम आदमी पार्टी खपवून घेणार नाही. जनतेसोबत त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी उभी असेल. गोरगरिब नागरिकांना रेशन धान्य पुरवठा सुरळीत करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आम आदमी पार्टीचे सांगली जिल्हा अध्यक्ष राम पाटील यांनी दिला आहे.**



आम आदमी पार्टीच्या वतीने शिराळा तालुक्यामध्येमध्ये रेशन धान्य मिळत नसल्याबाबत तहसीलदार शामल खोत यांना निवेदन देण्यात आले. यावेळी केशरी/ पिवळे रेशन कार्ड ऑनलाइन करून लाभार्थींना रेशन धान्य मिळावे, अशी मागणी करण्यात आली.यावेळी तालुकाध्यक्ष कृष्णाजी कदम, बाबासो पाटील, महादेव पाटील आणि आणि मोठ्या संख्येने तालुक्यातून आलेले रेशन धान्य वंचित नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, तहसीलदार शामल खोत यांनी सर्वसामान्य नागरिकांना धान्य मिळत नसेल, तर या प्रकरणात आम्ही लक्ष घालू आणि सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देऊ, असे आश्वासन दिले आहे.

### रेशन धान्य लाभार्थींमध्ये विरोधाभास...

**राम पाटील म्हणाले की, काही दिवसांपूर्वीच माहिती अधिकारात तालुका पुरवठा विभागाकडून माहिती घेतली होती. मात्र, अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केली. त्यामुळे आप तर्फे तालुक्यात सर्वेक्षण करण्यात आले. तालुक्यातील हजारो कुटुंबांचे ४४ हजारांच्या आत वार्षिक उत्पन्न आहे.**

**त्याचबरोबर कुणाकडे फोर व्हीलर नाही, कोणी सरकारी नोकरीला नाही, इन्कम टॅक्स भरत नाहीत असे हजारो कुटुंब शिराळा तालुक्यात असूनसुद्धा या लोकांना राशन धान्य मिळत नाही. याउलट, चारचाकी गाडीतून फिरणाऱ्या बागायतदार शेतकऱ्यांना रेशन मिळते, असा विरोधाभास आहे.**

# मुंबईत भाड्याने घर न मिळाल्याने उर्फीची खंत

**मॉडेल उर्फी जावेद सतत तिच्या अतरंगी कपड्यांमुळे चर्चेत असते. यावरुन अनेकजण तिला ट्रोल देखील करत असतात. मागील काही दिवसांपासून उर्फी आणि चित्रा वाघ यांच्यात रंगलेल्या सोशल मीडियावरील वादानंतर आता उर्फी पुन्हा एकदा आणखी एका कारणामुळे चर्चेत आली आहे. आता उर्फी सध्या मुंबईमध्ये भाड्याने घर शोधत आहे पण तिला मुंबईमध्ये राहण्यासाठी भाड्याने घर मिळत नाही. ती मुस्लिम असल्यामुळे आणि तिच्या कपड्यांमुळे तिला कोणीही घर भाड्याने द्यायला तयार नाही. असं तिने सांगितलं.**



उर्फीने ट्वीट शेअर करत लिहिलं की, "मी ज्या प्रकारचे कपडे घातले त्यामुळे मुस्लिम घराचे मालक मला भाड्याने घर द्यायला तयार नाही तर हिंदू मालक मी मुस्लिम असल्यामुळे तिला भाड्याने घर द्यायला तयार नाहीत. तर राजकारण्यांकडून मला मिळत असेल्या धमक्यांमुळे काही घर मालकांना मला भाड्याने घर द्यायचे नाही. मुंबईमध्ये भाड्याने घर शोधणं खूप कठीण झालं आहे."



### भाजपा नेता चित्रा वाघ यांनी केली होती तक्रार

नुकत्याच काही दिवसांपूर्वी उर्फी मुंबई पोलिसांनी समन्स पाठवला होता. उर्फी विरोधात भाजपा नेता चित्रा वाघ यांनी तक्रार दाखल केली होती.

# "...घरी येऊन घाल मला लग्नाची मागणी",

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय शो आहे. या कार्यक्रमातील हास्यवीर प्रेक्षकांना खळखळवून हसवतात. अनेक विनोदवीरांना हास्यजत्रेमुळे प्रसिद्धी मिळाली. अभिनेत्री शिवाली परबही याच कार्यक्रमातून घराघरात पोहोचली.

हास्यजत्रेमुळे शिवालीच्या चाहत्या वर्गात दिवसेंदिवस भर पडत आहे. शिवाली सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असून ती चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करते. नवीन प्रोजेक्टबद्दल शिवाली तिच्या चाहत्यांना माहिती देत असते. तसंच अनेकदा ती फोटो व व्हिडीओही शेअर करताना दिसते. शिवालीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहे.शिवाली एक उत्तम अभिनेत्री आहे. हास्यजत्रेतून प्रसिद्धी मिळवलेल्या शिवालीने चित्रपटांतही काम केलं आहे. 'प्रेम प्रथा धुमशान' या चित्रपटात ती मुख्य भूमिकेत दिसली होती. या चित्रपटातील तिने दिलेल्या किसींग सीनचीही चर्चा रंगली होती.




# जिनिलीयाने अमृताला ओळख दाखवण्यास दिला नकार?

मराठी चित्रपटसृष्टीमधील आघाडीची अभिनेत्री म्हणून अमृता खानविलकरला ओळखले आहे. अमृता खानविलकर ही कायमच विविध कारणांनी चर्चेत असते. नुकतंच अमृता खानविलकरने अभिनेत्री जिनिलीया देशमुखबरोबर एक रील केला आहे. या रीलने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.

अमृता खानविलकरने नुकतंच इन्स्टाग्राम एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओत अमृता खानविलकर अभिनेत्री जिनिलिया देशमुखबरोबर रील करताना दिसत आहे. या व्हिडीओच्या सुरुवातीला अमृता खानविलकर ही जिनिलियाला हॅलो करत आहे.

आणखी वाचा : VIDEO : "राज ठाकरे की उद्धव ठाकरे? महाराष्ट्र जास्त समर्थपणे कोण सांभाळू शकतं?" उर्मिला मातोंडकर म्हणतात...


त्यानंतर अमृताही जिनिलियाला "तुला कुठे तरी पाहायला सारखं वाटतंय", असं म्हणते. त्यावर जिनिलिया ही हसत हसत "तुम्हाला मी ओळखत नाही" असं अमृताला सांगते. त्यावेळी अमृता तिला म्हणते "अरे, तू मला विसरलीस, मी तुझ्या शेजारी राहायचे, माझ्या घरी मोठमोठे सेलिब्रेटी यायचे." त्यावर जिनिलिया ही हा हा असं म्हणते आणि "मला काहीही आठवत नाही", असे निरागस पद्धतीने





# क्वीन इज बॅक! कंगना रणौतला परत मिळालं तिचं ट्विटर अकाउंट,

अभिनेत्री कंगना रणौत ही नेहमीच तिची बेधडक वृत्ती आणि स्पष्टवक्तेपणामुळे चर्चेत असते. समाजातील तिला न आवडणाऱ्या, न पटणाऱ्या गोष्टींबद्दल ती बिनधास्तपणे सोशल मीडियावरून तिची मतं मांडत असते. तिच्या याच स्पष्टवक्तेपणामुळे मध्यंतरी तिचं ट्विटर अकाउंट सस्पेंड करण्यात आलं होतं. मात्र आता तिला ते परत मिळालं आहे.



कंगना रणौतला नुकतंच तिचं ट्विटर अकाउंट परत मिळालं. तिचं जुनंच अकाउंट आता रिस्टोर करण्यात आलं आहे. त्यामुळे मोठ्या गॅपनंतर ती ट्विटरवर परतली आहे. हे अकाउंट परत मिळाल्या मिळाल्या लगेच तिने एक ट्वीट करत त्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.या अकाउंटवरून कंगनाने एक ट्वीट केलं. तिने लिहिलं, "सर्वांना नमस्कार, इथे परत आल्याचा मला आनंद झाला." हे ट्वीट कंगनाच्या टीमच्या वतीने करण्यात आलं आहे. आता या ट्वीटवर कमेंट्स करत तिच्या चाहत्यांप्रमाणेच अनेक सेलिब्रिटींनी देखील तिचं स्वागत केलं आहे.



काही वर्षांपासून ती या माध्यमावर फार सक्रिय होती. पण मे २०२१ मध्ये कंगना रणौतचे ट्विटर अकाउंट सस्पेंड करण्यात आलं होतं. ट्विटर कंपनीच्या कायद्याचे उल्लंघन केल्याने तिच्यावर ही कारवाई झाली होती. ट्विटरद्वारे ती वेगवेगळ्या विषयांवर सतत व्यक्त व्हायची. कंपनीद्वारे अकाउंटवर निर्बंध आल्यामुळे तिने अन्य सोशल मीडिया साईट्सचा आधार घेतला. तर आता पुन्हा एकदा ती ट्विटरवर परतली आहे.

# भारत-पाक वर्ल्डकपमध्ये 2 वेळा भिडणार?

## 15 ऑक्टोबरला खेळवला जाणार सामना : वीरेंद्र सेहवागने आधीच सांगितले 4 फायनलिस्ट संघ

।दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतात यावर्षी ५ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या विश्वचषक २०२३ चे वेळापत्रक अखेर आयसीसीने जाहीर केले आहे. नरेंद्र मोदी स्टेडियमवर २०१९ च्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीतील संघ इंग्लंड आणि न्यूझीलंड या स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात आमनेसामने येतील..**





८ ऑक्टोबर रोजी चेन्नई येथे भारत आपल्या मोहिमेची सुरुवात ऑस्ट्रेलियाविरुद्ध करेल. एकूण १० वेगवेगळ्या शहरांमध्ये या मेगा इव्हेंटचे सामने होणार आहेत. भारत आणि पाकिस्तान (IND VS PAK) १५ ऑक्टोबर रोजी अहमदाबाद येथे खेळवला जाईल.

वर्ल्डकपच्या वेळापत्रकाची घोषणा करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वीरेंद्र सेहवाग आणि मुथय्या मुरलीधरन देखील उपस्थित होते. वीरेंद्र सेहवागने एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली भारताच्या २०११ च्या विश्वविजेते पदाच्या आठवणीही सांगितल्या.

यादरम्यान सेहवागला एकदिवसीय विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहोचणाऱ्या चार संघांचा अंदाज लावण्यासही सांगण्यात आले. त्याचवेळी सेहवाग आणि मुरलीधरन यांनी २०२३ च्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीचे भाकीत केले आहे.

वीरेंद्र सेहवागने पाकिस्तानला सेमीफायनल म्हणून निवडले हे पाहणे मनोरंजक आहे आणि बाबर आझम आणि त्याचे खेळाडू पहिल्या चारमध्ये स्थान मिळवतात की नाही हे पाहणे त्यामुळे अधिक उत्सुकतेचे ठरणार आहे. विश्वचषकाच्या शेवटच्या मोसमात पाकिस्तानला उपांत्य फेरीपर्यंत मजल मारता आली नव्हती.

सेहवागने विश्वचषक स्पर्धेतील भारताच्या संधींबद्दल स्पष्टपणे सांगितले आणि विराट कोहलीसाठी संघाने ट्रॉफी जिंकली पाहिजे असे सांगितले. तो म्हणाला, "प्रत्येकाला विराट कोहलीसाठी हा विश्वचषक जिंकायचा आहे. तो ज्या प्रकारचा महान खेळाडू आहे, तो एक महान माणूस देखील आहे, तो नेहमी इतर खेळाडूंना मदत करतो."

### काय म्हणाला सेहवाग?

»वीरेंद्र सेहवागच्या म्हणण्यानुसार, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात अंतिम सामना होणार आहे. त्याचवेळी मुथय्या मुरलीधरनच्या मते भारत आणि इंग्लंड यांच्यात अंतिम सामना रंगणार आहे. सेहवागच्या मते, टीम इंडियाशिवाय इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहोचतील. इंग्लंड एकदिवसीय फॉर्मेटमध्ये गतविजेता आहे, त्याने मागील विश्वचषक जिंकला आहे, तर ऑस्ट्रेलियाने पाच वेळा ट्रॉफी जिंकली आहे.

# वानखेडे स्टेडियमवर वर्ल्ड कप सामना खेळण्यासाठी विराट कोहली उत्सुक

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयसीसीने वेळापत्रक जाहीर केल्यानंतर विराट कोहलीसोबतच्या संभाषणाचा व्हिडीओही शेअर केला आहे. ज्यामध्ये कोहली म्हणाला की, "विश्वचषकादरम्यान मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. या मैदानावर अनेक चांगल्या आठवणी आहेत. तेच वातावरण पुन्हा अनुभवायला मिळणं खूप छान असणार आहे. देशांतर्गत विश्वचषक खेळणे खूप खास आहे. मला २०११ मध्ये वरिष्ठ खेळाडूंना पाहून त्यांच्यासाठी काय अर्थ आहे हे समजले." आयसीसीने भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. यजमान भारत ८ ऑक्टोबरपासून या मेगा स्पर्धेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. दरम्यान विराट कोहलीने विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया दिली आहे.

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ भारतात ५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. आयसीसीने मुंबईतील एका कार्यक्रमादरम्यान मेगा इव्हेंटचे वेळापत्रक सुरू होण्याच्या १०० दिवस आधी जाहीर केले. स्पर्धेतील पहिला सामना इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे, तर यजमान भारत ८ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. एकदिवसीय विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर भारतीय संघाचा माजी कर्णधार विराट कोहलीची प्रतिक्रियाही समोर आली आहे.



### या मैदानावर अनेक चांगल्या आठवणी

» एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात प्रथमच भारत एकट्याने ही मेगा स्पर्धा आयोजित करत आहे. यापूर्वी, १९८७, १९९६ आणि २०११ मध्ये खेळल्या गेलेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारताने आशियाई उपखंडातील पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका या देशांसोबत या स्पर्धेचे आयोजन केले होते.

### भारत आपले सामने 9 वेगवेगळ्या शहरांमध्ये खेळणार

या वनडे वर्ल्ड कपमध्ये भारतीय संघ सर्वाधिक प्रवास करेल. संघ आपले सामने ९ वेगवेगळ्या शहरांमध्ये खेळणार आहे. अशा परिस्थितीत त्यांना २ नोव्हेंबरला मुंबईच्या मैदानावर क्वालिफायर २ संघाविरुद्ध सामना खेळण्याची संधी मिळेल. कोहलीने २०११ साली भारतासाठी एकदिवसीय विश्वचषकाच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात महत्त्वपूर्ण वेळी ३५ धावांची

# धोनी वर्ल्डकप जिंकण्यासाठी संपूर्ण विश्वचषकामध्ये खायचा फक्त खिचडी

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आयर्लंडविरुद्धच्या मालिकेपासून भारतीय क्रिकेट संघात परतण्याची शक्यता आहे. या टी-२० मालिकेसाठी त्याची निवड करून त्याची तंदुरुस्त चाचणी होण्याची शक्यता आहे. एका वर्षापासून भारतीय क्रिकेट संघाबाहेर असलेला बुमराह वर्ल्ड कप स्पर्धेच्यावेळी पूर्ण बहरात असावा ही भारतीय संघाची अपेक्षा आहे.**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) विश्वचषक २०२३चे वेळापत्रक जाहीर केले आहे. मंगळवारी (२७ जून) मुंबईतील एका कार्यक्रमात त्याने हा खुलासा झाला. यावेळी श्रीलंकेचा महान फिरकी गोलंदाज मुथय्या मुरलीधरन उपस्थित होता. सेहवागने भारतीय संघासाठी तीन विश्वचषक खेळले आहेत. २००३ मध्ये टीम इंडिया फायनलमध्ये पराभव पत्करावा लागला होता आणि २००७ मध्ये ती पहिल्याच फेरीत बाहेर पडली होती. त्यानंतर २०११मध्ये महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली संघाने विजय मिळवला.

या कार्यक्रमादरम्यान सेहवागने २०११च्या विश्वचषकातील त्याच्या आठवणी शेअर केल्या. प्रत्येक सामन्यात चौकार मारून सुरुवात करायची होती असे त्याने सांगितले. त्याचवेळी टीम इंडियाला तेव्हा महान फलंदाज सचिन तेंडुलकरला वर्ल्डकप जिंकायचा होता. याशिवाय त्याने तत्कालीन कर्णधार धोनीबद्दल एक मजेशीर गोष्ट सांगितली. सेहवाग म्हणाला की, प्रत्येक खेळाडूची स्वतःची सुपरस्टीशन असतात.



### धोनीविषयी काय म्हणाला सेहवाग?

»सेहवागने सांगितले की, "धोनीने संपूर्ण विश्वचषकामध्ये फक्त खिचडी खाल्ली होती. या स्पर्धेतील बहुतांश सामन्यांमध्ये धोनी चांगला फॉर्ममध्ये नसल्याचा खुलासा त्याने केला. मात्र, भारत सामने जिंकत असताना 'खिचडी' खाण्याची चाल त्याने सुरूच ठेवली. धोनीने संपूर्ण स्पर्धेत एकही मोठी खेळी खेळली नाही, मात्र अंतिम फेरीत त्याने नाबाद ९१ धावा करत संघाला चॅम्पियन बनवले."सेहवाग पुढे म्हणाला, "प्रत्येकाकडे काही ना काही युक्ती होती आणि प्रत्येकजण आपली ती गोष्ट फॉलो करत होता. महेंद्रसिंग धोनीने संपूर्ण विश्वचषकादरम्यान खिचडी खाण्याची युक्ती सुरू ठेवली होती. तो म्हणायचा की मी धावा करत नसलो तरी ही युक्ती काम करत आहे आणि आम्ही सामना जिंकत आहोत. काहीजण याला अंधश्रद्धा म्हणतील पण प्रत्येकाचा एक विश्वास असतो."